Test Booklet No.
परीक्षा पुस्तिका संख्या

162502

This booklet contains 16 pages.
इस पुस्तिका में 16 पृष्ठ हैं ।

# JBC – 12A

**PAPER II / प्रश्न-पत्र II**
**PART IV & V / भाग IV & V**
**Marathi Language Supplement**
मराठी भाषा परिशिष्ट

Test Booklet Code
परीक्षा पुस्तिका संकेत

**X**

**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 15 & 16) of this Test Booklet.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 15 व 16) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**

**For instructions in Marathi see Page 2 of this booklet. / मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें ।**

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue / Black Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **X**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part IV : Language I – (Marathi) *(Q. 91 to Q. 120)*
   Part V : Language II – (Marathi) *(Q. 121 to Q. 150)*
7. Part IV contains 30 questions for Language I and Part V contains 30 questions for Language II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language I and/or Language II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part V (Language II) in a language other than the one chosen as Language I (in Part IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

## *परीक्षार्थियों के लिए निर्देश*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **X**. यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य प्रश्न पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग IV : भाषा I — (मराठी) *(प्र. 91 से प्र. 120)*
   भाग V : भाषा II — (मराठी) *(प्र. 121 से प्र. 150)*
7. भाग IV में भाषा I के लिए 30 प्रश्न और भाग V में भाषा II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा I और/या भाषा II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिएँ।**
8. **परीक्षार्थी भाग V (भाषा II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

Name of the Candidate (in Capitals) : ____________________
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में ) :
Roll Number (अनुक्रमांक) : in figures (अंकों में) ____________________
: in words (शब्दों में) ____________________
Centre of Examination (in Capitals) : ____________________
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में ) :
Candidate's Signature : ____________________ Invigilator's Signature : ____________________
परीक्षार्थी के हस्ताक्षर : निरीक्षक के हस्ताक्षर :
Facsimile signature stamp of Centre Superintendent ____________________

SEAL

ही पुस्तिका 16 प्रष्ठ आहे.

चाचणी पुस्तिका कोड

**X**

# JBC – 12A

**प्रश्नपत्रिका II**

**भाग IV आणि V**

**मराठी भाषा पुरवणी**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (15 आणि 16) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग चौथा (भाषा पहिली) **किंवा** भाग पाचवा (भाषा दुसरी) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग पहिला आणि भाग दुसरा **किंवा** तिसरा सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग चौथा आणि पाचवा सोडवायचा आहे.
3. भाग चौथा आणि पाचवा यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड X** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून ध्या. जर काही विसंगती असेल त. परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत चौथा आणि पाचवा असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग चौथा : भाषा पहिली – (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग पाचवा : भाषा दुसरी – (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग चौथा मध्ये भाषा पहिली साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग पाचवा मध्ये भाषा दुसरी साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा पहिली व/वा भाषा दूसरी साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग पाचवा (भाषा दुसरी) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा पहिली (चौथ्या भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये ____________________

: शब्दांमध्ये ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________

पर्यवेक्षकाची सही ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

परीक्षार्थींनी जर **भाषा पहिली** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग IV
## भाषा I
## मराठी

*सूचना : योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.*

**91.** 'दरोडेखोरां' साठी समूहवाचक नाम हे आहे
(1) कळप
(2) तांडा
(3) टोळी
(4) थवा

**92.** 'वर जाऊन पलंगावर झोप' या वाक्यात अधोरेखित शब्द __________ आहे.
(1) उभयान्वयी अव्यय
(2) क्रियाविशेषण
(3) विशेषण
(4) शब्दयोगी अव्यय

**93.** रेल्वेत एका प्रवाशाची जागा खिडकीजवळ होती. तुम्हाला त्याने खिडकी बंद करायला हवी आहे. तुम्ही विनंती कशी कराल ?
(1) ए, खिडकी बंद कर रे.
(2) खिडकी बंद करता का ?
(3) जरा खिडकी बंद करता का ?
(4) कृपया खिडकी बंद करा.

**94.** खालील संवाद वाचा :
शिक्षक – आज सुरेश शाळेत आला नाही का ?
विद्यार्थी – नाही. आज तो शाळेत आला नाही.
शिक्षक – आज तो शाळेत का आला नाही ?
पहिल्या वाक्यातील 'का' वापरून शिक्षकांनी
(1) कारण विचारले आहे
(2) माहिती विचारली आहे
(3) परवानगी दिली आहे
(4) खात्री करून घेतली आहे

**95.** खालीलपैकी कोणते उभयान्वयी अव्यय आहे ?
(1) वगैरे
(2) परंतु
(3) तर
(4) इत्यादी

**96.** तो चांदीचा मोठा पेला रोहिणीचा आहे. ते चांदीचे मोठे पेले रोहिणीचे आहेत. या वाक्यांमधून काय कळते ?
(1) शब्दाच्या वचनाबरोबर सर्व विशेषणांचेही वचन बदलते
(2) विशेषणाचे वचन बदलले तरी क्रियापद बदलत नाही
(3) विशेषणाचे वचन बदलले की विशेषणांची वाक्यातील जागा बदलते
(4) मराठीत सामान्यरूपे कशी होतात ?

**97.** मुख्याध्यापकांनी मुलांना बक्षिसं वाटली. मुख्याध्यापकांकडून मुलांना बक्षिसं वाटण्यात आली. दुसरे वाक्य ____________ याचे उदाहरण आहे.
(1) भावे प्रयोग
(2) कर्मणी प्रयोग
(3) अकर्मक क्रियापद
(4) कर्तरी प्रयोग

**98.** बोधनात्मक शैलीच्या प्रकारांमध्ये खालीलपैकी कोणत्या जोडीचा समावेश असतो ?
(1) सक्रिय / निष्क्रिय (active / passive)
(2) संपूर्ण समावेशक / विश्लेषणात्मक (wholistic / analytic)
(3) अर्थानिरूपणात्मक / मूलभूत (interpretative / literal)
(4) भावनिक / समजूतदार (emotional / sensible)

99. भाषा अध्ययन आणि मूल्यांकन या संदर्भात 'विद्यार्थी संचिका' (portfolio) म्हणजे

(1) प्रत्येक सत्रात घेतलेल्या तोंडी चाचण्या

(2) विद्यार्थ्यांची ठराविक कालावधीत झालेली प्रगती दर्शवणारा कामाचा संग्रह

(3) शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीची प्रत्येक सत्रात ठेवलेली नोंद

(4) ठराविक मुदतीने घेतलेल्या पेन पेपर चाचण्या

100. वाचन करताना 'विसांकेतिकीकरण' (to decode) म्हणजे

(1) गुंतागुंतीचे कोडे सोडवणे

(2) विश्लेषण करणे व समजून घेणे

(3) परभाषा समजणे

(4) ICT मधील एक कृती

101. वक्ता 1 अजून तुझी आई घरी आली का ?
वक्ता 2 हो.

विद्यार्थ्यांच्या भाषण-श्रवण या कौशल्याचे मूल्यांकन करताना या संभाषणात कोणत्या वक्त्याचे गुण कापले जातील ?

(1) पहिला वक्ता

(2) दुसरा वक्ता

(3) दोघांचेही

(4) कोणाचेही नाहीत

102. लिखाण करताना, सुसंगतीसाठी वापरली जाणारी युक्ती (device) ही आहे

(1) संक्षेपीकरण (ellipsis)

(2) विशेषण (adjective)

(3) शब्दयोगी अव्यय (preposition)

(4) वाक्प्रचार (पदबंध) (phrase)

103. लिखाणाचा मजकूर लहान, पूर्ण, तृतीयपुरुषी, विषयांतर आणि भावनिक उद्रेक नसलेला आणि तर्कशुद्ध पद्धतीने मांडलेला असेल तर ते लिखाण

(1) ज्ञापन

(2) अहवाल

(3) वृत्तपत्रीय लेख

(4) वर्गीकृत जाहिरात

104. सूर्यग्रहण केव्हा आहे ? या प्रश्नाचा काळ हा आहे

(1) वर्तमानकाळ

(2) भविष्यकाळ

(3) अपूर्ण वर्तमानकाळ

(4) भूतकाळ

105. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 च्या शिफारशीनुसार शाळेने वाचन आणि लेखन याकडे खालील भाषेमध्ये विशेष ध्यान देण्याची गरज नाही

(1) मातृभाषा

(2) हिंदी

(3) इतर परकीय भाषा

(4) इंग्रजी

*सूचना : खाली दिलेला उतारा वाचा आणि त्याखालील प्रश्नांची (प्रश्न सं. 106 – 114) उत्तरे देण्यासाठी बरोबर पर्यायावर खूण करा.*

आगरकरांच्या क्रांतीकारी विचारांचं महत्त्व आजही कायम आहे. आगरकरांनी 'सुधारक' वर्तमानपत्र काढून त्यातल्या लेखांद्वारे निद्रिस्त समाजाला जाग आणली. समाजात सुधारणा घडवून आणायचा प्रयत्न केला.

आगरकरांच्या मते, वाचन हे ज्ञानसंपादनाच्या सर्व साधनांमधे अत्यंत महत्त्वाचं साधन आहे. पुस्तकं ही माणसाचे मित्रच असतात. बहुश्रुत सन्मित्रांच्या सहवासामुळे होणारे सर्व फायदे चांगल्या पुस्तकांच्या वाचनापासून होतात. सन्मित्रांप्रमाणेच चांगल्या पुस्तकांशी केलेली मैत्री मनुष्याला सुसंस्कृत बनवते. त्याला रानटी राहू देत नाही. ज्ञानार्जनाची इतर साधनं सर्वांना सहजपणे मिळतीलच असं नाही पण वाचन मात्र

अत्यंत अल्प खर्चात सर्वांना उपलब्ध होऊ शकतं. मुद्रणकलेचा शोध लागल्यापासून तर वाचन अत्यंत सुलभ झालं आहे. कोणत्याही विद्वानाला स्वतः सर्व ठिकाणी हजर राहून स्वतःचे विचार व्यक्त करणं अशक्य आहे. तेच विचार जर त्यांनी पुस्तकरुपाने प्रसिद्ध केले तर ते सर्वांपर्यंत पोचू शकतात.

मोठमोठया विचारवंतांनी आपापले विचार पुस्तक रूपी नौकेत घालून ठेवले नसते तर कालरूपी सागरात नष्ट झाले असते. जगात दरवर्षी नवे शोध लागताहेत. जुने शोध मागे पडताहेत. जे शाळेत संपादलेल्या ज्ञानालाच चिकटून रहातात, त्याचं जगात हसं होतं. शिक्षक, डॉक्टर यांना जर नवीन ज्ञान मिळवण्याची तळमळ नसेल तर त्यांना नुकसान सोसावं लागेल. ते इतरांपेक्षा एक शतक मागे पडतील.

संसारात माणसावर मोठमोठी संकटं येतात. कोणाचा एकुलता एक मुलगा मरण पावतो. कोणाला भयंकर अपघात होतो. दुःख असह्य झाल्यामूळे माणूस कधी कधी वेडा होतो. अशा वेळी दुःखाचा विसर पडण्यासाठी, संकटातून बाहेर पडण्यासाठी त्याला पुस्तकांचा फार मोठा आधार असतो. शांती मिळवण्याचा वाचनाशिवाय दुसरा मार्ग नाही.

**106.** आगरकरांनी निद्रिस्त समाजाला जाग आणण्यासाठी

(1) जाळपोळ केली

(2) मोर्चे काढले

(3) लेख लिहिले

(4) सत्याग्रह केले

**107.** आगरकरांच्या मते ज्ञानसंपादनाचे महत्त्वाचे साधन म्हणजे

(1) संगणक

(2) चर्चा

(3) वाचन

(4) प्रवास

**108.** आगरकरांच्या मते 'बहुश्रुत सन्मित्र' कोण ?

(1) विद्वान

(2) शिक्षक

(3) पुस्तके

(4) चित्रपट कलावंत

**109.** 'वाचन' हे ज्ञानार्जनाचे सर्वात सुलभ साधन आहे कारण

(1) वाचन सर्वांना परवडण्या सारखे आहे

(2) सगळी साधने सर्वत्र मिळतातच असे नाही

(3) सर्वांना वाचन आवडते

(4) इतर साधने महाग असतात

**110.** शाळेत मिळवलेल्या ज्ञानावरच खूष रहातात त्यांचे

(1) त्यांना पुस्तके वाचता येत नाहीत

(2) त्यांचे जगात हसे होते

(3) त्यांना लेख लिहिता येत नाही

(4) ज्ञान संपून जाते

**111.** संकटातून बाहेर पडण्यासाठी

(1) शाळेतील शिक्षण उपयोगी पडते

(2) पुस्तकांचा मोठा आधार असतो

(3) संगीताचा उपयोग होतो

(4) चित्रपटांचा आधार वाटतो

**112.** सुसंस्कृत म्हणजे

(1) सुसभ्य

(2) सुशिक्षित

(3) संक्रातीच्या दिवशी जन्मलेला

(4) संस्कृतचा अभ्यास केलेला

**113.** नौका म्हणजे

(1) नाव
(2) जहाज
(3) पाणबुडी
(4) पाण्यात तरंगणारी वस्तू

**114.** "निद्रिस्त समाज" म्हणजे

(1) झोपी गेलेला समाज
(2) जाग झालेला समाज
(3) निद्रानाश झालेला समाज
(4) निद्रेचा अस्त झालेला समाज

***सूचना :*** *खाली दिलेली कविता वाचा आणि सर्वोत्कृष्ट पर्याय निवडून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची (प्रश्न क्र. 115 ते 120), उत्तरे द्या.*

सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना
तिमिरातुनी तेजाकडे प्रभु आमुच्या ने जीवना ।।
सुमनात तू गगनात तू
ताऱ्यामधे फुलतोस तू
सद्धर्म जे जगतामधे
सर्वात त्या वसतोस तू
चोहीकडे रूपे तुझी जाणीव ही माझ्या मना ।।
श्रमतोस तू शेतामधे
तू राबसी श्रमिकासवे
जे रंजले वा गांजले
पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे तिथे तुझे पद पावना ।।
करुणाकरा करुणा तुझी
असता मला भय कोठले
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पावले
सुजनत्व या हृदयामधे नित वागवी भीतीविना ।।

**115.** कवितेत परमेश्वर कुठे रहात नाही ?

(1) आकाशात
(2) वाऱ्यामध्ये
(3) चांदण्यांमध्ये
(4) फुलांमध्ये

**116.** कवीला परमेश्वराची रूपे कोणात आढळतात ?

(1) स्वार्थी लोक
(2) देवळातील मूर्ती
(3) शेतकरी
(4) श्रीमंत माणसे

**117.** "आसवे पुसणे" म्हणजे

(1) रडणाऱ्याचे डोळे पुसणे
(2) दुःख दूर करणे
(3) आसवांचे कारण विचारणे
(4) आसवे वहाणे

**118.** "तिमिरातुनी तेजाकडे जाणे" म्हणजे

(1) तारांबळ उडणे
(2) अज्ञानातून ज्ञानाकडे जाणे
(3) अंधारात दिवा लावणे
(4) तिरीमिरी येणे

**119.** कवीला भीती का वाटत नाही ?

(1) कारण तो रोज पूजा करतो
(2) कवी भित्रा नाही
(3) परमेश्वराचं त्याच्याकडे लक्ष आहे
(4) परमेश्वराने त्याला वर दिला आहे

**120.** कवी देवाकडे काय मागतो ?

(1) कसण्यासाठी जमीन
(2) देवाचे दर्शन
(3) खूप संपत्ती
(4) भयहीन सज्जनपणा

परीक्षार्थींनी जर **भाषा दुसरी** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग V
# भाषा II
# मराठी

*सूचना : योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.*

**121.** इंग्रजीच्या पाठ्यक्रमात संवादलेखनाचा समावेश मुख्यतः __________ तपासण्यासाठी करतात.

(1) अचूक व्याकरण

(2) संभाषण कौशल्य

(3) सृजनशीलता

(4) प्रवाही लेखन

**122.** शिकवले जाते ते सर्व शिकले जातेच असे नाही कारण

(1) विद्यार्थी अनौपचारिक चर्चा सुरू असतानाच लक्ष देतात

(2) शिक्षकाचा सामाजिक व आर्थिक स्तर विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्तरापेक्षा वेगळा असतो

(3) विद्यार्थ्यांच्या क्षमता व व्यक्तिमत्त्वे वेगवेगळी असतात आणि त्यांची पार्श्वभूमीही वेगळी असते

(4) शिक्षक किंवा विद्यार्थी कोणत्याही विषयावर पूर्णतः प्रभुत्व मिळवू शकत नाहीत

**123.** मध्यवर्ती कल्पना सांगणारे एक वाक्य खालीलपैकी कशात असते ?

(1) भाषण

(2) परिच्छेद

(3) संभाषण

(4) निबंध

**124.** ज्ञानरचनावाद हा असा सिद्धान्त आहे की ज्यात

(1) विद्यार्थी स्वतःच्या अनुभवांमधून आणि जगाविषयीच्या ज्ञानामधून स्वतःचे मत बनवतात

(2) विद्यार्थ्यांना निरनिराळ्या माध्यमांतून संशोधन स्वतःचे सिद्धान्त बनवणे हे शिक्षक सुकर करतात

(3) विद्यार्थी स्वतःच अध्ययन सामग्री तयार करतात जेणे करून त्यांना स्वावलंबनाचा अनुभव मिळतो

(4) विद्यार्थी विविध न्यादर्शांचा (sample) अभ्यास करून सुस्थापित निष्कर्ष काढतात

**125.** एखाद्या संस्थेत शैक्षणिक साधनसामग्री सर्वांपर्यंत पोचवण्यास पुढीलपैकी कोणते संप्रेषण तंत्रज्ञान मदत करते ?

(1) इंट्रानेट

(2) डेलनेट

(3) एरनेट

(4) इंटरनेट

**126.** संगणकनिर्मित वास्तविकता म्हणजे

(1) व्हिडिओकॉन्फरन्सिंग

(2) संगणकनिर्मित दृश्यीकरणाचे (visualization) अत्याधुनिक साधन

(3) व्हिडिओडिस्क

(4) टेलिकॉन्फरन्सिंग

**127.** पुढीलपैकी कोणते क्रमवाचक विशेषण आहे ?

(1) चौघे

(2) चौपट

(3) चारदा

(4) चौथे

128. खालीलपैकी जोडशब्दाचे उदाहरण कोणते आहे ?

(1) अनियमित / बेजबाबदार

(2) खळखळ / कुरकूर

(3) केरकचरा / वेणीफणी

(4) डोकेदुखी / दरवडेरवोर

129. भाषाग्रहण म्हणजे

(1) व्याकरणाचे विश्लेषण व आकलन आणि शब्दसंपत्तीचे पाठांतर याकडे पाहण्याचा पद्धतशीर दृष्टिकोन असतो

(2) मानवी मेंदूच्या क्षमतेमुळे मातृभाषा किंवा द्वितीय भाषा शिकण्याची प्रक्रिया असते

(3) विद्यार्थ्यांना मातृभाषा शिकण्यासाठी लागणारे वातावरण निर्माण करण्याचे तंत्र असते

(4) ज्यात आवश्यक शब्दसंपत्तीचे पाठांतर आणि वापर गरजेचा असतो

130. 2005 च्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयानुसार (NCF) कोणत्या भाषेच्या अध्यापनाचे ध्येय हे साक्षरतेद्वारा अमूर्त विचार व ज्ञानग्रहण करण्याचे साधन असते ?

(1) प्रथम भाषा

(2) तृतीय भाषा

(3) अभिजात भाषा

(4) द्वितीय भाषा

131. खालीलपैकी कोणता वाक्प्रचार नाही ?

(1) झक मारणे

(2) गप्पा मारणे

(3) मासे मारणे

(4) माशा मारणे

132. विजयकेंद्री पद्धतीमध्ये अध्ययनानुभव ________ भोवती आखलेला असतो.

(1) शिक्षकाचे विषयावरील प्रभुत्व

(2) विषय

(3) शैक्षणिक तंत्रज्ञान

(4) विद्यार्थ्यांची आवड

133. मूल्यांकनाचा निकष हा असतो

(1) गुणांची प्रश्नवार विभागणी

(2) विद्यार्थ्यांच्या क्षमते बद्दलचे सर्वसाधारण मत

(3) गुण देण्याबद्दलच्या सूचना (scoring key)

(4) मूल्यमापनाची नियमावली

134. खालीलपैकी कोणत्या शब्दात दन्त्य व्यंजन नाही ?

(1) धनगर

(2) ताट

(3) थाप

(4) कापड

135. वाचन करताना

(1) नोंद घेणे (note-making)

(2) सारांश लिहिणे (summarising)

(3) आकलन होणे

(4) टिपणं काढणे (note taking)

***सूचना :*** *खाली दिलेला उतारा वाचा आणि त्यानंतरच्या प्रश्नांची (प्र. क्र. 136 ते 141) उत्तरे द्या. त्याकरिता सर्वात जास्त उचित पर्याय वापरा.*

एका रानात एक ओबडधोबड काळाकुळकुळीत खडक पडलेला होता. त्याच्या जवळच एक फुलांची वेल होती. त्या वेलीवर पांढरी गोंडस फुले होती. वाऱ्याबरोबर त्यांचा मंद सुवास वातावरण प्रसन्न करत असे. त्यांना स्वतः च्या सौंदर्याचा

गर्व झाला. ती त्या खडकाची थट्टा करत. त्याला "काळतोंड्या" म्हणून हिणवत. त्याला वाईट वाटायचे पण तो गप्प बसायचा.

एकदा एक मूर्तीकार दगडाच्या शोधात त्या रानात आला. ती काळीभोर शिळा पाहून तो आनंदित झाला. "या काळ्या पाषाणाची मूर्ती खूपच सुंदर दिसेल." कारागिराने ताबडतोब मूर्ती घडवण्यास सुरवात केली. खडक असंख्य टाकीचे घाव सहन करत होता. बघता बघता एक सुरेख मूर्ती तयार झाली. कलाकार खूष झाला. त्याने त्या जवळच्या वेलीवरून फुले तोडून आणून मूर्तीला वाहिली.

त्या मूर्तीचे सौंदर्य पाहून फुले थक्क झाली. त्यांना खडकाला कमी लेखल्याची लाज वाटली. गावकरी तीच फुले रोज मूर्तीच्या पायावर वाहत असत, त्यांची माळ करून मूर्तीला घालत असत. फुलांचे गर्वाचे घर खाली झाले.

**136.** खालीलपैकी कुठल्या शब्दाचा अर्थ दगड असा होत नाही ?

(1) पाषाण

(2) पर्वत

(3) शिळा

(4) खडक

**137.** खालीलपैकी कुठला पर्याय "वासांचे" विशेषण नाही ?

(1) सुगंध

(2) दरवळ

(3) सहवास

(4) सुवास

**138.** "कमी लेखणे" म्हणजे

(1) बरोबरीचा न समजणे

(2) हिणवणे

(3) कमी पगार देणे

(4) कमी लिखाण करणे

**139.** मूर्तीकार रानात का आला ?

(1) ध्यान लावण्यासाठी

(2) सहलीसाठी

(3) वन्य प्राण्यांच्या शोधात

(4) मूर्ती बनवण्यासाठी दगडाच्या शोधात

**140.** "गर्वाचे घर खाली" याचा अर्थ

(1) घराबद्दल गर्व वाटणे

(2) गर्विष्ठ माणसाची फजिती होणे

(3) खालच्या मजल्यावर रहाणारा गर्विष्ठ माणूस

(4) गर्विष्ठ माणसाला घर खाली करायला लागणे

**141.** कलाकार का खूष झाला ?

(1) गावकऱ्यांनी मूर्तीची पूजा केली

(2) त्याने ओबडधोबड खडकातून सुरेख मूर्ती घडवली

(3) फुलांचे गर्वहरण झाले

(4) कलाकाराला जंगल फार आवडले

***सूचना :*** *खाली दिलेला उतारा वाचा आणि त्यानंतरच्या प्रश्नांची (प्र. क्र. 142 ते 150) उत्तरे द्या. त्याकरिता सर्वात जास्त उचित पर्याय वापरा.*

एका गावात श्रीधर नावाचा एक चित्रकार रहात होता. तो माती, कोळसा, वनस्पती अशा नैसर्गिक वस्तूंपासून रंगनिर्मिती करत असे. एके दिवशी श्रीधरच्या घरी एक श्रीमंत माणूस आला. त्याने त्याची चित्रे पाहिली. खूष होऊन तो म्हणाला, "आपण मला नृत्य करणाऱ्या मोराचे चित्र काढून द्याल का ?" श्रीधर गोंधळला. क्षणभर विचार करून म्हणाला, "मला एका महिन्याचा अवधी द्या."

एका महिन्यानंतर तो माणूस श्रीधरच्या घरी आला. श्रीधरने एकाग्रतेने त्या माणसासमोर बसून नृत्य करणाऱ्या मोराचे चित्र काढले. मोर त्या चित्रातून बाहेर येऊन नाचू लागेल असे वाटत होते. तो माणूस श्रीधरला म्हणाला, "याचा किती मोबदला देऊ ?" श्रीधर शांतपणे म्हणाला, "पाच हजार रुपये !" ते ऐकून तो माणूस हबकला. तो म्हणाला, "फक्त अर्ध्या तासात

तू हे चित्र पूर्ण केलंस. अर्ध्या तासाच्या कामासाठी पाच हजार ! ही किंमत जरा जास्तच आहे असं तुला वाटत नाही का ?

श्रीधरला वाईट वाटले. त्याने आत जाऊन कागदांचा एक गठ्ठा आणला. ती मोराची शेकडो चित्रे होती. या सरावामुळेच तो अर्ध्या तासात हे चित्र काढू शकला होता. त्याच्या साधनेचे ते फळ होते. श्रीधरच्या या स्पष्टीकरणाने त्या माणसाच्या डोक्यात प्रकाश पडला. कला अनमोल असते. ती एक साधना असते, तपश्चर्या असते, अभ्यास असतो हे त्याच्या लक्षात आले. श्रीधरच्या कलेची किंमत चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे त्याला लाज वाटली. त्याने श्रीधरची माफी मागितली.

**142.** श्रीधर कुठले रंग वापरत असे ?

(1) आसपास साण्डणाऱ्या नैसर्गिक वस्तूंपासून बनवलेले रंग

(2) परदेशातून आणलेले रंग

(3) बाजारात उपलब्ध असणारे रंग

(4) अतिशय महागडे रंग

**143.** श्रीधरने मोराचे चित्र काढण्यासाठी एक महिन्याची मुदत का मागितली ?

(1) त्याला इतर अपुरी चित्रे पूर्ण करायची होते

(2) त्याच्याजवळचे रंग संपलेले होते

(3) तो स्वतःचे महत्त्व वाढवत होता

(4) त्याला सराव करायचा होता

**144.** श्रीधरने मोराचे चित्र किती वेळात काढले ?

(1) एका तासात

(2) पंधरा दिवसात

(3) तीस मिनिटात

(4) दोन तासात

**145.** श्रीमंत माणसाला का लाज वाटली ?

(1) त्याला चित्र काढता आले नाही

(2) त्याने चित्राचे चुकीचे मूल्यांकन केले

(3) त्याला श्रीधरच्या घरी जावे लागले

(4) त्याच्या हातून चित्रावर डाग पडला

**146.** मोबदला म्हणजे

(1) भाडे

(2) व्याज

(3) सवलत

(4) किंमत

**147.** 'शंभर' पासून न बनणारा शब्द

(1) शताब्दी

(2) शतक

(3) शेरभर

(4) शेकडा

**148.** 'तापणे' या पासून न तयार होणारा शब्द कोणता ?

(1) तापट

(2) तपश्चर्या

(3) तप्त

(4) तापमान

**149.** 'असं तुला वाटत नाही का ?' या वाक्यातील 'वाटणे' या अर्थाचा पर्याय कोणता ते सांगा

(1) ती पाट्यावर चटणी वाटत होती

(2) तिला भीती वाटत होती

(3) ती थकलेली वाटत होती

(4) ती सर्वांना प्रसाद वाटत होती

**150.** या कथेचे तात्पर्य काय ?

(1) चांगलं चित्र काढण्यासाठी आधी भरपूर सराव करावा लागतो

(2) श्रेष्ठ कलेचे मोल करता येत नाही

(3) श्रीमंत माणसे वाट्टेल ती किंमत देऊन चित्रे विकत घेतात

(4) कलावंत लोभी असतो

## SPACE FOR ROUGH WORK

SEAL

# SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे करा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.
2. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी ध्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
3. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा, कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
4. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
5. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
6. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
7. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
8. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याशिवाय आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनांची बाब मानली जाईल.
9. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
10. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनांच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
11. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
12. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे.** ***चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

SEAL

**READ CAREFULLY THE FOLLOWING INSTRUCTIONS :**

1. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with Blue/Black Ball Point Pen on Side-2 of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
2. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
3. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
4. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
5. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
6. Each candidate must show on demand his / her Admission Card to the Invigilator.
7. No candidate, without special permission of the Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
8. The candidates should not leave the Examination Hall without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet a second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case.
9. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
10. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
11. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
12. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room / Hall.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

**निम्नलिखित निर्देश ध्यान से पढ़ें :**

1. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के पृष्ठ-2 पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह नीले/काले बॉल पॉइन्ट पेन से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
2. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
3. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
4. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
5. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश कार्ड के सिवाय किसी प्रकार की पाठ्य सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, काग़ज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
6. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-कार्ड दिखाएँ ।
7. अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
8. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा ।
9. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
10. परीक्षा-हॉल में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
11. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
12. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष / हॉल छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें ।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।***